जनतेचा
# सावधान महाराष्ट्र
निर्भीड आणि निष्पक्ष

Postal No - NMB/194/2025-27
Posted AT- koparkhairane Navi mumbai, Weekly Thursday

मुख्य संपादक : राजेंद्र बोडके : ९३२२५९२८१४

◆वर्ष : ६ ◆अंक : १ ◆नवी मुंबई / ठाणे / महाराष्ट्र ◆मंगळवार दि. १६ डिसेंबर २०२५ ते २२ डिसेंबर २०२५ ◆मराठी साप्ताहिक ◆पाने : ४ ◆किंमत : २ /- ◆RNI- MAHMAR/2020/79438

जनतेचा सावधान महाराष्ट्र या वृत्तपत्रासाठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका, शहर व ग्रामीण विभागासाठी पत्रकार व जाहिरातदार नेमणे आहे, अनुभवी व इच्छुकांनी खालील नंबरवर संपर्क साधावा.

## अखेर राज्यातील महापालिकांचा
# निवडणुकीचा बिगूल वाजला

**आचारसंहिता लागू** | सोमवारपासून आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. ही आचारसंहिता डिझास्टरसाठी आडकाठी राहणार नाही.

### मुंबई–ठाण्यासह २९ महापालिकांसाठी निवडणुका जाहीर

**मुंबई:** ठाण्यासह राज्यातील प्रलंबित २९ महापालिकांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. या महापालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून त्याचा निकाल १६ जानेवारी रोजी लागणार आहे. त्यासाठी काल पासून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेऊन ही घोषणा केली. राज्यातील २९ महापालिकांसाठी ३ कोटी ४८ लाख मतदार मतदान करणार आहेत.

ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका या गेल्या पाच ते सात वर्षांपासून किंवा त्या पेक्षा जास्त काला वधीपासून प्रलंबित होत्या. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला. त्यामध्ये सुरुवातीला २ डिसेंबर रोजी नगरपालिका आणि नगरपरिषदांच्या निवडणुका घेण्यात आल्या. आता त्यानंतर राज्यातील प्रलंबित २९ महापालिकांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला.



**राज्यातील २७ महापालिकांची मुदत संपली आहे. त्यासोबत जालना आणि इचलकरंजी या दोन नवीन महापालिकांच्या निवडणुका होणार आहेत. या महापालिका निवडणुकांसाठी १ जुलै २०२५ रोजीची मतदान यादी ग्राह्य धरण्यात येणार आहे. ही यादी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून आली असल्याने त्यामध्ये नावे वगळण्याचे अधिकार राज्य आयोगाला नाहीत असं स्पष्ट करण्यात आलं आहे.**

**१५** जानेवारी रोजी
## मतदान

**१६** जानेवारी रोजी
## निकाल

### महापालिकेच्या निवडणुकीचे वेळापत्रक

- नामनिर्देशन पत्र स्वीकारणे २३ डिसेंबर ते ३० डिसेंबर
- अर्जाची छाननी – ३१ डिसेंबर
- उमेदवारी माघारीची मुदत – २ जानेवारी
- चिन्ह वाटप आणि अंतिम उमेदवार यादी – ३ जानेवारी
- मतदान – १५ जानेवारी
- निकाल – १६ जानेवारी

- मुंबई महापालिकेमध्ये एक सदस्यीय वॉर्ड असल्यामुळे १ मतदारांना एकच मत द्यावं लागणार आहे. तर उर्वरित २८ महापालिकांसाठी एक ते पाच सदस्यीय वॉर्ड असल्याने त्यानुसार मतदान द्यावं लागणार आहे.
- महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज फक्त २ ऑफलाईन पद्धतीने करता येणार आहे. तसेच ज्या उमेदवारांकडे सध्या जात वैधता प्रमाणपत्र नाही त्यांना निवडणुकीपासून सहा महिन्यांच्या आत सादर करावं लागणार आहे.
- मतदार जनजागृतीसाठी रील तयार करण्यात आले आहेत. ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठी मतदार केंद्रावर आवश्यक त्या सुविधा असतील. मतदान केंद्रावर रॅप आणि व्हील चेअर असतील.
- राज्यातील १,९६, ६०५ कर्मचारी या निवडणुकीसाठी काम करतील. मतदानाच्या आधी ४८ तास प्रचारावर बंदी असेल. तसेच त्या दरम्यान जाहिरातींवरही बंदी असेल. महापालिका निवडणूक नियमांनुसार ही बंदी असेल.
- राज्यातील २९ महापालिकांसाठी एकूण ६ २,८६९ जागांसाठी मतदान होणार आहे. त्यामध्ये १,४४२ महिला सदस्य, ७५९ इतर मागासवर्गीय सदस्य, ३४१ अनुसूचित जाती तर ७७ सदस्य हे अनुसूचित जमातीचे सदस्य असतील.

### निवडणूक खर्चाची मर्यादा

महापालिका निवडणुकीसाठी खर्चाची मर्यादा निवडणूक आयोगाने आखून दिली आहे. त्यामध्ये मुंबईसह अ वर्ग महापालिकांसाठी एका उमेदवाराला १५ लाख रुपये खर्च करण्याची मुभा आहे.

# सिडकोची घरे १० टक्क्यांनी स्वस्त; १९ हजार घरांची महागृहनिर्माण योजना जाहीर




**प्रतिनिधी जनतेचा सावधान महाराष्ट्र: नवी मुंबई :** नवी मुंबईतील सर्वसामान्य नागरिकांसाठी दिलासादायक ठरणारा महत्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला असून, सिडकोच्या विविध प्रवर्गातील घरांच्या किंमतींमध्ये थेट १० टक्के कपात करण्यात आली आहे. या निर्णयामुळे नवी मुंबईत घर घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्या हजारो कुटुंबांना मोठा लाभ होणार आहे.

सिडकोतर्फे वाशी, बामणडोंगरी, खारकोपर, खारघर, तळोजा, मानसरोवर, खांदेश्वर, पनवेल आणि कळंबोली या महत्वपूर्ण नोड्समध्ये उभारण्यात आलेल्या १९,००० घरांची महागृहनिर्माण योजना दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी अधिकृतपणे जाहीर करण्यात येणार आहे. या योजनेसाठी नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून इच्छुक नागरिकांनी अधिक माहितीसाठा www.cidcohomes.com या संकेतस्थळास भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

या निर्णयाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, सिडकोच्या घरांच्या किंमतींमध्ये १० टक्के कपात करण्याचा निर्णय हा सामान्य माणसाच्या घराच्या स्वप्नाला बळ देणारा आहे. नवी मुंबईसारख्या जागतिक दर्जाच्या शहरात प्रत्येक सर्वसामान्य नागरिकाचे स्वतःचे घर असावे, यासाठी राज्य शासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या निर्णयाचे स्वागत करताना सांगितले की, सिडकोच्या घरांच्या किंमतींमध्ये करण्यात आलेली कपात ही सर्वसमावेशक आणि परवडणाऱ्या गृहनिर्माण उद्दिष्टांशी सुसंगत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'सर्वांसाठी घरे' या संकल्पनेला बळ देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असून, यामुळे लाखो अर्जदारांना घर स्वस्त दरात मिळण्याची सुवर्णसंधी प्राप्त होणार आहे.

सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी माहिती देताना सांगितले की, ''माझे पसंतीचे सिडकोचे घर'' या योजनेअंतर्गत बामणडोंगरी, कळंबोली, खारकोपर, खारघर, खांदेश्वर, मानसरोवर, पनवेल, वाशी आणि तळोजा या सर्व नोडमधील घरांच्या किंमती देखील १० टक्क्यांनी कमी करण्यात आल्या आहेत. ही सुधारित किंमत विद्यमान लाभार्थी तसेच भावी अर्जदारांना लागू राहणार आहे.

अल्प उत्पन्न गट आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातील घरे अधिक परवडणारी ठरणार असून, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मिळणाऱ्या २.५ लाख रुपयांच्या अनुदानासोबतच १० टक्के स्वस्त किंमतींचा दुहेरी लाभ मिळणार आहे. त्यामुळे घरखरेदीचा एकूण आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

तसेच १९ फेब्रुवारी २०२५ रोजी काढण्यात आलेल्या सोडतीमध्ये यशस्वी ठरूनही ज्यांनी घरे सरेंडर केली होती, अशा अर्जदारांनाही सुधारित अटींनुसार पुन्हा एकदा योजनेत सहभागी होण्याची संधी देण्यात येणार आहे. त्यासाठी संबंधित अर्जदारांना घर निश्चित करण्यासाठी १० दिवसांची मुदत देण्यात आली असून, त्यांनी https://cidcohomes.com या संकेतस्थळावर भेट देऊन प्रक्रिया पूर्ण करावी, असे सिडकोकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या हालचालींना वेग; भाजपाविरोधात आघाडीची शक्यता

**पिंपरी चिंचवड:** आगामी पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टी आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने वेगवेगळे लढण्याचा निर्णय घेतला असला, तरी प्रत्यक्ष मैदानात राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येण्याच्या हालचालींना वेग आला आहे. निवडणुकीत मतविभाजन टाळून भाजपाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी स्थानिक पातळीवर एकत्रित लढण्याचा सूर जोर धरू लागला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही लढत मैत्रीपूर्ण असेल असे जाहीर केले असले, तरी पुणे व पिंपरी चिंचवड महापालिकेत राष्ट्रवादीची सत्ता आणण्यासाठी आपण सर्वस्व पणाला लावू, असे सांगत अजित पवार यांनी भाजपाला थेट आव्हान दिले आहे. त्यानंतर आता दोन्ही राष्ट्रवादी गटांमध्ये संभाव्य आघाडीबाबत हालचाली वाढल्या आहेत.



याबाबत अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे निवडणूक प्रमुख नाना काटे यांनी सांगितले की, काही दिवसांपूर्वी अजित पवार यांनी स्थानिक पातळीवर शरद पवार गटाशी चर्चा करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार दोन्ही गटात साधक–बाधक चर्चा झाली. तसेच त्यांच्या मुलीच्या लग्नावेळी सुप्रिया सुळे यांचा फोन आला असता, मतविभाजन टाळण्यासाठी स्थानिक पातळीवर चर्चा करा, असा सल्ला त्यांनी दिल्याचेही नाना काटे यांनी स्पष्ट केले. यासंदर्भातील माहिती वरिष्ठ नेत्यांना दिली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.


दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटासाठी भारतीय जनता पार्टी हा प्रमुख राजकीय विरोधक असल्याचे स्पष्ट करत, भाजपाला रोखायचे असेल तर स्थानिक पातळीवर आघाडी करणे गरजेचे असल्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती शरद पवार गटाचे कमिटी सदस्य सुनील गव्हाणे यांनी दिली. अलीकडे झालेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत दोन्ही राष्ट्रवादी वेगवेगळ्या लढल्यास मतविभाजन होऊन त्याचा फायदा भाजपाला होईल, असा सूर असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यामुळे मतविभाजन टाळण्यासाठी दोन्ही राष्ट्रवादी गटांनी एकत्रित लढावे, अशी भावना कार्यकर्त्यांमध्ये असल्याचेही गव्हाणे यांनी स्पष्ट केले. त्यानुसार स्थानिक पातळीवर प्राथमिक चर्चा सुरू असून येत्या दोन ते तीन दिवसांत चित्र स्पष्ट होईल, असे त्यांनी सांगितले. मात्र घड्याळ चिन्हावर निवडणूक लढवण्याबाबत अद्याप कोणताही अधिकृत प्रस्ताव नसून, वरिष्ठ पातळीवरून जे आदेश येतील त्याचे पालन केले जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, या संभाव्य आघाडीत शिंदेसेनाही सहभागी होणार का, याबाबत चर्चा सुरू आहे. शिंदेसेनेचे खासदार श्रीरंग बारणे यांच्यासोबत सकारात्मक चर्चा झाल्याचे नाना काटे यांनी सांगितले. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी गट आणि शिंदेसेना एकत्रित आघाडी करून पिंपरी चिंचवड महापालिका निवडणूक लढवण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र आघाडी करताना फायदे - तोटे लक्षात घेऊनच अंतिम निर्णय घेतला जाईल, अशी सावध भूमिका शरद पवार गटाकडून व्यक्त करण्यात आली आहे.

# नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५ प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या प्रसिध्द

मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्र. रानिआ / मनपा – २०२५ / प्र. क्र. ४१ / का – ५, दिनांक ०९ डिसेंबर २०२५ अन्वये २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणूकांकरिता प्रभागनिहाय अंतिम मतदार यादीचा कार्यक्रम निश्चित करण्यात आलेला आहे.




त्यानुसार नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक – २०२५ करिता प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या दि. १५ डिसेंबर २०२५ रोजी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय, संबंधित विभाग कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर तसेच नवी मुंबई महानगरपालिकेच्या https://www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर आणि सोशल मिडीयावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

मा. राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्र. रानिआ/जिपपस–२०२५/प्र.क्र.३३/का–७, दिनांक ०९ डिसेंबर २०२५ रोजीच्या पत्रान्वये स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीकरिता मतदार यादीची प्रत (अंतिम मतदार यादी) (फोटोसह) प्रतिपृष्ठ रु. २/- (रुपये दोन फक्त) इतका दर आकारून उपलब्ध करून देता येईल.

तसेच मतदारांकरीता नाव शोधण्याची (Voter Search) सुविधा मा. राज्य निवडणूक आयोगाच्या https://mahasecvoterlist.in/ वेबसाईटवर Search name in voter list या टॅबमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे, याची नोंद घेण्यात यावी.

# शिंदे सेनेची नवी मुंबईत मुसंडी; मढवी कुटुंबासह काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा प्रवेश

**प्रतिनिधी जनतेचा सावधान महाराष्ट्र : नवी मुंबई :** नवी मुंबईच्या राजकीय वर्तुळात मोठी हालचाल पाहायला मिळाली असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेची ताकद लक्षणीयरीत्या वाढली आहे. उद्धव ठाकरे यांचे निकटवर्तीय व कट्टर शिवसैनिक म्हणून ओळख असलेले शिवसेना उबाठा गटाचे ऐरोली - बेलापूर विधानसभा संपर्क प्रमुख एम. के. मढवी, महिला उपजिल्हा संघटक तथा माजी नगरसेविका विनया मढवी, युवासेना सहसचिव तथा माजी नगरसेवक करण मढवी यांनी आज शिंदे यांच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

याच वेळी काँग्रेस पक्षाचे मिथून पाटील, अमित पाटील आणि पूनम पाटील यांनीही शिवसेनेत प्रवेश केल्याने नवी मुंबईतील राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे दिसत आहेत. हा प्रवेश सोहळा ठाणे येथील वर्तकनगर परिसरातील टिपटॉप हॉटेलमध्ये पार पडला.




या प्रवेश कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार नरेश म्हस्के तसेच शिवसेना उपनेते विजय चौगुले यांची प्रमुख उपस्थिती होती. या नेत्यांनी प्रवेश करणाऱ्या सर्व पदाधिकाऱ्यांचे पक्षात स्वागत करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

उबाठा गटातील तसेच काँग्रेसमधील महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांनी शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केल्यामुळे नवी मुंबईत शिंदे सेनेची संघटनात्मक ताकद दुप्पट वाढल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा प्रवेश शिंदे सेनेसाठी महत्त्वाचा राजकीय टप्पा मानला जात असून नवी मुंबईतील राजकारणाला नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

जनतेचा सावधान महाराष्ट्र
निर्भीड आणि निष्पक्ष

## संपादकीय

# गोरगरीबांच्या मुलांचे शिक्षण वाऱ्यावर

राज्यातील त्रिभाषा धोरणावरील विरोध वाढत असून, सरकारच्या गतवर्षीच्या संचमान्यता निर्णयामुळे शैक्षणिक व्यवस्था ढासळण्याची भीती आहे. या निर्णयामुळे विशेषतः गोरगरीबांच्या मुलांसाठी शाळेचे दरवाजे कायमचे बंद होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

पुरोगामी राज्य म्हणून देशभरात महाराष्ट्र ओळखला जातो. याच पुरोगामी राज्यात शिक्षणाची ज्ञानगंगा गोरगरीबांच्या दारी पोहचविण्यासाठी महापुरुषांनी स्वतःच्या घरावर तुळशीपत्र ठेवले. प्रसंगी पत्नीचे मंगळसूत्र गहाण ठेवून गोरगरीबांच्या मुलांसाठी शाळा चालविल्या. शिक्षण तळागाळापर्यंत पोहचविण्याचा वसा घेतलेल्या महापुरुषांचा वारसा सांगणाऱ्या राज्यकर्त्यांकडूनच आता शाळा बंद करून गोरगरीबांच्या मुलांच्या शिक्षणाचे दरवाजे कायमचे बंद करण्याची धोरणे राबविण्यात येत आहेत.

सरकारच्या शैक्षणिक धोरणामुळे मराठी भाषिक शाळा संकटात येऊन दरवर्षी बंद पडत आहेत. मराठी भाषिक शाळा बंद पडत असल्यामुळे मराठी संस्कृतीच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाल ा आहे. ग्रामीण भागात नोकरी - व्यवसाय नसल्याने गाव, खेडी ओस पडू लागली आहेत. याचे परिणाम शाळांवरदेखील होऊ लागले आहेत. शाळांचा पट दरवर्षी घसरू लागला आहे. ग्रामीण भागातील मुलांना शिक्षण मिळावे यासाठी सरकारने निर्णय घेणे अपेक्षित असते. मात्र सरकार केवळ धोरणांच्या अंमल बजावणीत अडकून पडते. यामुळे नवीन संकटे निर्माण होतात, याचा आदर्श नमुना म्हणून गतवर्षीच्या संच मान्यतेचा निर्णय म्हणता येईल.

राज्यात सर्व व्यवस्थापनाच्या सुमारे १ लाख १० हजार शाळा आहेत. त्यामध्ये सुमारे २ कोटी १२ लाख मुले शिक्षण घेत आहेत. आठवीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १९.२८ लाख आहे, तर नववीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १८.६३ लाख आहे. शासकीय शाळांमधून इयत्ता आठवीमधून इयत्ता नववीमध्ये प्रवेश घेतेवेळी सुमारे १ लाख विद्यार्थ्यांची गळती होत आहे. त्यापैकी ४० हजार विद्यार्थी खासगी व्यवस्थापनाच्या माध्यमिक शाळेत प्रवेश घेत आहेत. मात्र उर्वरित ६० हजार विद्यार्थी माध्यमिक शिक्षण घेत नसल्याचे दिसत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा उपलब्ध नसल्यामुळे ही गळती होत असल्याचा दावा शिक्षण विभाग करत आहे. मात्र गळती होणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न होताना दिसत नाहीत.

यातच सरकारने गतवर्षी संच मान्यतेच्या सुधारित निर्णयाद्वारे शासन अनुदानित, अंशतः अनुदानित, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा बंद करण्याचे षडयंत्र रचल्याचा आरोप शिक्षण क्षेत्रातून होत आहे. या निर्णयामुळे गोरगरीब व सामान्य कुटुंबातील विद्यार्थी शिक्षणाच्या मूळ प्रवाहातून बाहेर फेकले जाण्याची भीती व्यक्त होत आहे. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाच्या धोरणाला संपुष्टात आणून शिक्षणाच्या बाजारीकरणाचे धोरण शासन प्रत्यक्षात अंमलात आणत आहे. स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतरसुद्धा राज्यातील ८ हजार २१३ गावांत प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळा नाहीत आणि अस्तित्वात असलेल्या शाळा बंद पाडण्याचे धोरण शासन प्रत्यक्षात राबवित आहे, ही अत्यंत समाजघातक व दुःखदायक बाब असल्याचे मत माजी शिक्षक आमदार ना. गो. गाणार यांनी व्यक्त केले आहे.

१५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार शैक्षणिक सत्र २०२४ - २५ ची संचमान्यता शाळांना वितरित केल्यामुळे शिक्षण क्षेत्रात प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे. प्रत्येक जिल्ह्यातील अनेक शाळांना शून्य शिक्षकपदे मंजूर करण्यात आली आहेत, तर शून्य शिक्षकपदे मंजूर करण्यात आलेल्या शाळा पर्यायाने बंद करण्याचा कट रचण्यात आला आहे. शासन व प्रशासनाच्या शाळा मान्यता माध्यमिक शाळा संहिता आणि बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतुदीनुसार देण्यात येतो.


त्यामुळे प्रत्येक शाळेला शैक्षणिक व प्रशासकीय यंत्रणा सांभाळण्यासाठी मुख्याध्यापकाचे पद मंजूर करणे अत्यावश्यक आणि बंधनकारक आहे. मात्र विद्यार्थी संख्येच्या निकषावर मुख्याध्यापकाचे पद देय ठरवले आहे. यामुळे शाळेची प्रशासकीय यंत्रणा उद्ध्वस्त होणार आहे. एकंदरीतच संच मान्यतेचे सुधारित निकष विहित करणारा १५ मार्च २०२४चा शासन निर्णय अस्तित्वात असलेल्या खासगी अनुदानित, शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा संपुष्टात आणून सर्वसामान्यांच्या शिक्षणाचा अधिकार हिरावून घेणारा आहे. त्यामुळे सदर शासन निर्णय तत्काळ रद्द घोषित करून इयत्ता निहाय विषय कार्यभाराच्या आधारे शिक्षक व विशेष शिक्षकांची पदे मुख्याध्यापकाच्या पदासह निश्चित करणारा शासन निर्णय घोषित करणे अत्यावश्यक आहे.

त्यामुळे अशैक्षणिक शासन निर्णय दि. १५ मार्च २०२४ रद्द घोषित करून शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेला हाहाकार थांबवावा, अन्यथा स्फोटक परिस्थिती निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. शासनाच्या शैक्षणिक धोरणामुळे मराठी भाषिक शाळांची झालेली दुर्दशा सुधारण्यासाठी धोरणात्मक बदल करण्याच्या हेतूने अभ्यासगट गठित करणे अत्यावश्यक व निकडीचे आहे. संच मान्यतेच्या धोरणाला शिक्षक संघटनांकडून तीव्र विरोध होत आहे. सरकारने संच मान्यतेच्या निकषांमध्ये बदल करण्याची मागणी संघटना करत आहेत. यासाठी संघटनांनी ५ डिसेंबर रोजी शाळा बंद आंदोलन केले. मात्र हे आंदोल न शिक्षण विभागाने चिरडून टाकण्यासाठी आंदोलनात सहभागी होणाऱ्या शिक्षकांचा एक दिवसाचा पगार कापण्याचा निर्णय घेतला. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या भल्यासाठी संघटना सरकारचे लक्ष्य वेधू इच्छित असतानाही त्याकडे गांभीर्याने पाहत नाही. त्यामुळे शिक्षण विभागाने गोरगरीब मुलांच्या शिक्षणाचा विचार सोडून दिला आहे का, हे स्पष्ट करण्याची वेळ आली आहे.

# टँकरच्या बेदरकारपणाला चाप ?

### प्रादेशिक परिवहन विभागाकडून नोंदणीपत्र निलंबनाची कारवाई होणार

**वसई:** वसई विरार शहरात वाढत्या टँकर अपघाताच्या घटनेनंतर आता प्रादेशिक परिवहन विभाग खडबडून जागा झाला आहे. टँकर चालकांचा बेदारकारपणा, कालबाह्य झालेले टँकरची तपासणी करून चालकांना परवाना नोंदणी निलंबनाच्या नोटिसा पाठविल्या जाणार आहेत. त्यामुळे टँकर चाल कांच्या बेदरकारपणाला आळा बसणार असल्याचा दावा परिवहन विभागाकडून करण्यात आला आहे.



शहराची लोकसंख्या वेगाने वाढत आहे. त्यामुळे इमारती, चाळी, गृहसंकुले अशा ठिकाणी टँकरची मागणी अधिक असून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो. शहरात सुमारे एक हजाराहून अधिक टँकर शहरातील रस्त्यावर धावतात. मात्र यातील काही टँकर मालक व चालक नियमांचे पालन करीत नसल्याने अपघाताच्या घटना घडतात. काही टँकर अतिशय जुनाट झाले असून त्यांची कालमर्यादा संपली आहे. तर काही टँकरच्या पाण्याच्या टाक्या ही गंजून गळक्या झाल्या आहेत. त्यातून संपूर्ण रस्त्यावर पाणी सांडून रस्ते ओलेचिंब होतात. वाहनचाल कांना ही धोकादायक प्रवास करावा लागतो. तसेच सध्या वाढती टँकरची मागणी लक्षात घेता अधिकच्या फेऱ्या लागव्या म्हणून बेदरकारपणे टँकर चालविले जात आहेत. त्यामुळे सातत्याने अपघाताच्या घटना समोर येत आहेत. नुकताच विरार नारिंगी फाटकाजवळ टँकरच्या धडकेत १७ वर्षीय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला होता. तर यापूर्वी सुद्धा टँकर अपघाताच्या घटनांमध्ये अनेकांचा बळी गेला आहे. वाढत्या अपघाताच्या घटनांमुळे नागरिकांमधून टँकर चालकांच्या विरोधात रोष व्यक्त केला जात आहे. कालबाह्य झालेले टँकर व नियमबाह्य पद्धतीने चालविल्या जाणाऱ्या टँकरकडे वाहतूक व उपप्रादेशिक परिवहन विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने अजूनही धोकादायक पद्धतीने टँकर चालविण्याचे प्रकार सुरूच असल्याचा आरोप नागरिकांमधून करण्यात येत आहे. या अपघाताच्या घटनेनंतर आता परिवहन विभागाकडून बेदरकार टँकरवर नियंत्रण ठेवण्यासाठी कृती आराखडा तयार केला आहे. यामध्ये शहरात धावणाऱ्या टँकरची तपासणी केली जाणार आहे. यात टँकरचे फिटनेस प्रमाणपत्र, परवानाधारक वाहनचालक आणि बेंच, टँकरसोबत क्लीनर आहे की नाही, पाणी गळती आणि रिफ्लेक्टर अशा विविध बाबींची तपासणी होणार आहे. जे टँकर चालक नियमांचे पालन न करता आढळून येतील त्यांना कायदेशीर नोटिसा पाठवून नोंदणी प्रमाणपत्र निलंबनाची कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती प्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्याने दिली आहे. केवळ १३१ टँकरवरच कारवाई मागील काही वर्षात वसई विरार शहरात बेदरकरपणे टँकर चालवण्याचे प्रमाण वाढले आहे.

अशा टँकरविरोधात कारवाई करण्याची मोहीम परिवहन विभागाने हाती घेतली होती. पण, या मोहिमे अंतर्गत फक्त १३१ टँकर वरच कारवाई करण्यात आली आहे. तर, टँकर चालकांकडून ७ लाख ८३ हजार रुपये इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

# एटीएम कार्डद्वारे ५७ लाखांचा गंडा

**डोंबिवली :** ठाकुर्ली रेल्वे स्थानक परिसरात एका चोराने बँक एटीएममध्ये पैसे काढण्याचे व्यवहार करत असलेल्या नागरिकाचे एटीएम कार्ड हातचलाखीने हस्तगत करत त्याद्वारे ५७ लाख रुपये काढून फसवणूक केली. या प्रकरणी बसवानी लक्ष्मण नौकुडकर यांनी रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८ (४) प्रमाणे गुन्हा दाखल करून घेतला.

पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार बसवानी नौकुडकर हे बुधवारी सकाळी कामावर जाताना ठाकुर्ली रेल्वे स्थानकाजवळील एका बँकेच्या एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेले. या वेळी त्यांच्या पाठोपाठ एक व्यक्ती एटीएममध्ये पैसे काढण्याचे निमित्त करून आला. त्याने नौकुडकर यांचा डेबिट कार्डचा गुप्त संकेतांक पाहिला. त्यानंतर नौकुडकर यांना आपले डेबिट कार्ड एटीएमच्या खाच्यात अडकले आहे. तेवढे काढून द्या, अशी विनंती केली. या कालावधीत त्याने नौकुडकर यांचे कार्ड स्वतःजवळ घेतले आणि हातचलाखी करत बनावट डेबिट कार्ड नौकुडकर यांच्या ताब्यात दिले. त्यानंतर चोराने नौकुडकर यांच्या बँक खात्यामधील ५७ लाख ४९५ रुपयांची रक्कम ठरावीक अंतराने पाठोपाठ काढून घेतल्याचे लक्षात येताच नौकुडकर यांनी रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# पदोन्नती प्रकरणावरून एपीएमसी प्रशासनात वाद

**नवी मुंबई :** मुंबई एपीएमसीमध्ये उपअभियंता सुदर्शन भोजनकर यांच्या पदोन्नतीचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला असून, उच्च न्यायालयाच्या स्पष्ट आदेशानंतरही संचालक मंडळाने निर्णय लांबविल्याने नाराजी व्यक्त होत आहे. सोमवार, ८ डिसेंबर रोजी झालेल्या बैठकीत आदेशाची अंमलबजावणी न करता नवीन समिती गठित करण्याचा ठराव मंजूर करण्यात आल्याने, न्यायालयाच्या आदेशाकडे दुर्लक्ष केल्याची चर्चा एपीएमसी परिसरात रंगत आहे.

११ नोव्हेंबर रोजी मुंबई उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती अश्विन डी. भोबे आणि रवींद्र व्ही. घुगे यांच्या खंडपीठाने भोजनकर यांच्या बाजूने निर्णय देत 'वरिष्ठतेच्या आधारे ४५ दिवसांच्या आत पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करावी' असा स्पष्ट आदेश दिला होता. भोजनकर हे सध्याचे प्रभारी कार्यकारी अभियंता मेहबूब बेपारी यांच्यापेक्षा पाच वर्षांनी वरिष्ठ असल्याचे नोंदीत नमूद आहे.

तरीही तत्कालीन सभापती आणि सचिवांनी बेपारी यांची प्रभारी कार्यकारी अभियंता म्हणून नियुक्ती केली होती. या निर्णयाला भोजनकर यांनी न्यायालयात आव्हान दिल्यानंतर वरील आदेश देण्यात आला. मात्र आदेशाला महिना उलटूनही पदोन्नतीची अंमलबजावणी न झाल्याने मंडळावर टीकेची झोड उठली आहे.

# अतिरिक्त लोकलची प्रतीक्षा कायम

### बदलापूर येथील समस्येबाबत खासदारांच्या मागणीवर रेल्वेचे उत्तर

**बदलापूर :** मध्य रेल्वेच्या बदलापूर रेल्वे स्थानकातून दररोज हजारो प्रवासी प्रवास करतात. सकाळच्या सुमारास लोकलमध्ये तुडुंब गर्दी असते. त्यामुळे या मार्गावर अतिरिक्त लोकल वाढवाव्यात अशी मागणी खासदार सुरेश म्हात्रे यांनी केली होती. त्यावर उत्तर देताना रेल्वे प्रशासनाने सध्या अतिरिक्त लोकल चालवणे शक्य नसल्याचे स्पष्ट केले, तसेच तिसऱ्या चौथ्या मार्गिकेचे काम झाल्यानंतरच नव्या लोकल चालवता येतील, असेही स्पष्ट केले. त्यामुळे बदलापूरकरांना नव्या लोकलसाठी आणखी काही काळ प्रतीक्षा करावी



लागणार आहे. बदलापूर हे झपाट्याने नागरीकरण होत असलेले शहर आहे. पर्यायाने रेल्वे प्रवासी संख्या वाढत आहे. सकाळच्या वेळी हजारो प्रवासी मुंबई, ठाणे, नवी मुंबईच्या दिशेने प्रवास करतात. परिणामी सकाळच्या सत्रात लोकलमध्ये प्रचंड गर्दी असते. अनेकदा अपघाताची भीती असते. त्यामुळे सकाळच्या म्हणजे गर्दीच्या सत्रात लोकल गाड्यांची संख्या वाढवावी, अशी अनेक वर्षांपासून प्रवाशांची मागणी आहे. हीच मागणी खासदार सुरेश ऊर्फ बाळ्यामामा म्हात्रे यांनीही रेल्वे प्रशासनाकडे केली होती. त्या मागणीच्या पत्रावर रेल्वेच्या अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापकांनी पत्राद्वारे खुलासा केला आहे. रेल्वेने नव्या अतिरिक्त लोकल सुरू करणे शक्य नसल्याचे पत्रामध्ये स्पष्ट केले आहे. सकाळी ६ ते १० दरम्यान बदलापूर रेल्वे स्थानकातून १६ लोकल मुंबईच्या दिशेने धावतात. त्यातील काही लोकल कर्जत, खोपोली या स्थानकांतून सोडल्या जातात. तर अन्य लोकल बदलापूर स्थानकातून सोडल्या जातात. दिवसभरात कल्याण ते कर्जत यादरम्यान २४२ लोकल चालवल्या जातात. त्यामुळे या मार्गाची १०० टक्के क्षमता पूर्ण झाली असल्याचे रेल्वे प्रशासनाने सांगितले आहे.

परिणामी बदलापूर ते मुंबईदरम्यान कोणतीही नवी लोकल रेल्वे सुरू करता येणार नाही, असे रेल्वे प्रशासनाचे म्हणणे आहे. त्यामुळे रेल्वे प्रवाशांना नव्या लोकलसाठी आणखी काही काळ वाट पाहावी लागणार आहे.

# उरणच्या कोप्रोली परिसरात बिबट्याचा वावर?

**उरण :** अलिबागमध्ये बिबट्या दर्शन झाल्यानंतर आता उरणच्या कोप्रोली परिसरात बिबट्याचा वावर असल्याच्या खुणा दिसू लागल्या आहेत. याला उरणच्या वन विभागाने दुजोरा दिला आहे. त्यामुळे येथील नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन वन विभागाने केले आहे.

उरण तालुक्यातील कोप्रोली परिसरात गेल्या तीन ते चार दिवसांपासून बिबट्या वावरत असल्याची शक्यता स्थानिकांनी व्यक्त केली. बुधवारी सकाळी उरण वन विभागाच्या पथकाला बिबट्याच्या पाऊल खुणा, विष्ठा आणि दोन बकऱ्या व श्वान मृत अवस्थेत आढळले. पथकातील कर्मचारी डिविलकर यांनी कोप्रोल ीच्या डोंगराळ भागात बकऱ्यांना ओढत नेल्याच्याखुणा, उसे आणि विष्ठा आढळल्याचे सांगितले. जमा केलेले नमुने प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले असून अहवाल ानंतर परिस्थिती स्पष्ट होणार आहे. या पार्श्वभूमीवर कोप्रोली, पाणदिवे, कळंबुसरे आणि चिरनेर परिसरातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन वन विभागाने केले आहे. २०११ मध्ये करंजा बंदर परिसरात बिबट्या आढळला होता. त्यानंतर वेशवी, चिर्ले या परिसरात ही बिबट्या असल्याच्या खुणा आढळल्या होत्या, त्यामुळे उरण परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे स्पष्ट झाले होते. या संदर्भात वन विभागाकडून नागरिकांनी रात्री घराबाहेर पडू नये असे आवाहन केल ेआहे.

> कोप्रोली परिसरात बिबट्या असल्याच्या खुणा आढळून आल्या आहेत. दक्षता म्हणून वन विभागाकडून जनजागृती केली जात आहे. त्याचप्रमाणे विष्ठा परीक्षणासाठी पाठविण्यात येणार आहेत.
>
> – **एन.जी. कोकरे,**
> वन अधिकारी, उरण

# कुस्तीगिरांमध्ये नाराजी

### नवी मुंबईतील एकमेव आखाड्याला पालिकेचे टाळे

**नवी मुंबई :** नवी मुंबईसारख्या आधुनिक शहरात खेळाला प्राधान्य देत महापालिकेने पहिला व एकमेव तालीम आखाडा सुरू केला. या आखाड्यातून कुस्तीगीर नवी मुंबईच्या नावलौकिकात भर घालत आहेत. असे असतानाही या कुस्ती आखाड्याला पालिकेने टाळे ठोकले. यामुळे कुस्तीपटूंच्या सरावात मागील काही दिवसांपासून खंड पडत असल्याने कुस्तीगीरांमधून संताप व्यक्त होत आहे.




सानपाडा घणसोली, कोपरखैरणे, तुर्भे भागात महाराष्ट्राच्या सांगली, सातारा, कोल्हापूर या कुस्तीगीर घडविणाऱ्या जिल्ह्यांतील नागरिक मोठ्या प्रमाणावर राहतात. यामुळे २०१८ मध्ये सानपाडा सेक्टर २ येथे नवी मुंबई महानगरपालिकेने कुस्तीचा आखाडा उभा केला. सध्या १५० कुस्तीगीर याठिकाणी तालिम घेत आहे. कुस्ती आखाडा बंद केल्यामुळे उघड्यावर माती टाकून कुस्तीपटूंना सराव करण्याची वेळ आली आहे. याबाबत नवी मुंबई महापालिकेच्या मुख्यालय स्तरावरुन आम्हाला पालिकेच्या काही वास्तू सील करण्याबाबत यादी प्राप्त झाली त्याप्रमाणे विभाग कार्यालयाकडून कुस्ती आखाडा बंद करण्याची कार्यवाही करण्यात आली असल्याची माहिती तुर्भे विभागाचे सहाय्यक आयुक्त सागर मोरे यांनी दिली.

# वसई, विरारमध्ये पक्ष्यांना दाणे देण्यास बंदी

### सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छतेच्या तक्रारीची दखल

**वसई :** वसई, विरार शहरात सार्वजनिक ठिकाणी पक्ष्यांना दाणे टाकण्यास महापालिकेकडून बंदी करण्यात आली आहे, तसे सूचना फलक लावण्यात आले आहेत.

दादरमधील कबूतरखाना परिसरात कबुतरांना उघड्यावर दाणे टाकण्यावरून झालेल्या वादाचे मुंबईसह महाराष्ट्रातील इतर भागातही पडसाद उमटले होते. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशावरून कबुतरांची पिसे, विष्ठा आदींचा मानवी आरोग्यावर होणारा परिणाम अभ्यासण्यासाठी राज्य सरकारने तज्ज्ञ समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. शहरात रेल्वे स्थानक, बसांबे, मंदिरे, खाद्यपदार्थांची विक्री करणारी दुकाने, तसेच तलावंशेजारील मोकळ्या जागेत पक्ष्यांना दाणे टाकले जातात. त्यामुळे पिसे आणि विष्ठा पडून दुर्गंधी पसरू लागली आहे. नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याने शहरातही सार्वजनिक ठिकाणी पक्ष्यांना दाणे टाकण्यास प्रतिबंध करण्यात यावा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात होती. त्याची दखल महापालिकेने घेतली आहे. नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचा इशारा दिला आहे.

**विभागीय कार्यालय :** साईकृपा अपार्टमेंट E-1,/11, C-6 सेकटर 10, नेरुळ नवी मुंबई
**विभागीय कार्यालय :** रूम नं - J 155/156 से 2, ऐरोली नवी मुंबई

**संपादक**

सह संपादक : अरुण बिराजदार ९१ ९३२१८ ४७१३६
कार्यकारी संपादक : कुंडलिक कानगुडे ९१७-२१२-३०१३
उप संपादक : विक्रांत औटी ९६१९६२१२८७
कायदेशीर सल्लागार : ॲड.रचना एस. भालके. (B.Com,LL.B. M.Phil)
वकील उच्च न्यायालय

जनतेचा सावधान महाराष्ट्र — निर्भीड आणि निष्पक्ष

# वाशी वाहतूक पोलिसांची विशेष मोहीम; नियमभंगावर कडक कारवाई करत रस्ते सुरक्षेला प्राधान्य




**राजेंद्र बोडके (जनतेचा सावधान महाराष्ट्र) : वाशी, नवी मुंबई :** नवी मुंबई वाहतूक विभागाच्या मार्गदर्शनाखाली वाशी वाहतूक शाखेने डिसेंबर २०२५ मध्ये राबवलेल्या विशेष मोहिमेत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात प्रभावी व कडक कारवाई करून शिस्त आणि रस्ते सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. पोलीस उप आयुक्त (वाहतूक) नवी मुंबई तिरुपती काकडे यांच्या आदेशानुसार तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील कदम यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम यशस्वीपणे राबवण्यात आली.

दि. ०१/१२/२०२५ ते दि. १४/१२/२०२५ या कालावधीत दारू पिऊन वाहन चालवणे, रहदारीस अडथळा निर्माण करणारी वाहने तसेच नो - पार्किंगमध्ये उभी असलेली वाहने यांच्यावर विशेष लक्ष केंद्रित करून कारवाई करण्यात आली. या कालावधीत एकूण ३२०८ प्रकरणांमध्ये कारवाई करून २१,३७,६५० रुपयांची दंड आकारणी करण्यात आली असून २,८३,५०० रुपयांचा प्रलंबित दंड वसूल करण्यात आला आहे.

तसेच दारू पिऊन वाहन चालवणाऱ्या २२ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली असून संबंधित २२ चालकांचे परवाने निलंबित करण्याचा प्रस्ताव परिवहन विभागाकडे सादर करण्यात आला आहे. वाहतूक नियमांचा भंग करणाऱ्या ६७२ वाहनचालकांविरोधात मा. न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत.

याशिवाय वाशी परिसरातील गर्दीची ठिकाणे, शाळा व महाविद्यालयांमध्ये प्रबोधन कार्यक्रम राबवून सुरक्षित वाहतुकीबाबत जनजागृती करण्यात आली. सोशल मीडियाच्या माध्यमातूनही मद्यपान करून वाहन चालवू नये याबाबत ठोस संदेश देण्यात आला आहे.

वाशी वाहतूक पोलिसांनी शासकीय कार्यपद्धतीनुसार काटेकोर नियोजन, तत्पर अंमलबजावणी आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी केलेले हे कार्य निश्चितच कौतुकास्पद असून भविष्यातही अशीच कठोर व सातत्यपूर्ण कारवाई सुरू राहणार असल्याचे वाशी वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील कदम यांनी सांगितले

# झाडांच्या संरक्षक कठड्यांची दुरवस्था

## वसई, विरारमध्ये अपघाताचा धोका; दुरुस्तीकडे दुर्लक्ष

**वसई:** वसई विरार शहरात पदपथ, वाहतुकीचे मुख्य रस्ते तसेच प्रशासकीय कार्यालयातील झाडांभोवती सिमेंट काँक्रीटचे संरक्षक कठडे बांधण्यात आले. पण, गेल्या अनेक वर्षापासून या कठड्यांची डागडुजी न केल्यामुळे त्यांची दुरवस्था झाली आहे. तसेच या कठड्यातील झाडे रस्त्यावर पडल्यास अपघात होण्याचीही शक्यता निर्माण झाली असल्याने कठड्यांच्या दुरुस्तीची मागणी केली जात आहे.

वसई - विरार शहरात नवे रस्ते बांधताना, रस्त्याचे रुंदीकरण करताना तसेच नवे पदपथ बांधताना रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांना इजा पोहचू नये, तसेच रस्ते प्रकल्पांदरम्यान जास्तीत जास्त झाडे वाचावित म्हणून महापालिकेकडून रस्त्याच्याकडेला असणाऱ्या झाडांच्या सुरक्षेसाठी सिमेंट काँक्रीटचे संरक्षक कठडे बांधण्यात आले. या सुरक्षा कठड्यांमुळे रस्त्यालगतच्या झाडांचे संरक्षणही होते. तसेच रस्तेही यामुळे सुशोभित दिसतात. पण गेल्या काही काळात महापालिकेचे या कठड्यांचा देखभाल, दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाले. पावसाचे पाणी, फेरीवाल्यांनी केलेले अतिक्रमण, अपघातादरम्यान कठड्यावर येऊन आदळणारी वाहने, सततची रस्ते दुरुस्ती यामुळे झाडांभोवती बांधण्यात आलेले कठडे जीर्ण व नादुरुस्त झाले आहेत.



### तुटलेल्या कठड्यांचा भाग रस्त्यावर

- काही ठिकाणी भेगा पडून कठड्याचा काही भाग रस्त्यावर कोसळला आहे. त्यामुळे या तुटलेल्या कठड्यातील झाडे रस्त्यावर पडल्यास अपघात होण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.
- महापालिकेने हे सुरक्षा कठडे दुरुस्त करून घ्यावेत, अशी मागणीही होत आहे.
- नादुरुस्त कठड्यांची लवकरच दुरुस्त केले जातील, अशी माहिती महापालिकेतील संबंधित अधिकाऱ्यांनी दिली.

# मुलाच्या जन्मानंतर खर्च वाढल्यामुळे पत्नीला घरातून हाकलले; पतीवर गुन्हा दाखल

**भिवंडी :** मुलाच्या जन्मानंतर वाढलेल्या खर्चामुळे संतापलेल्या पतीने आपल्या पत्नीलाच घराबाहेर काढण्याचा प्रकार उघड झाला आहे.

तरुणीचे २०१८ मध्ये लग्न झाले होते. तिला सप्टेंबर २०२५ मध्ये मुलगा झाला. मूल झाल्यानंतर खर्च वाढला. संतापलेल्या पतीने पत्नीला मारहाण करून हाकलून दिल्याची घटना समोर आली.




याप्रकरणी पतीच्या विरोधात भिवंडीतील भोईवाडा पोलीस ठाण्यात पत्नीच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फकरुद्दीन इब्राहिम शेख (३६ रा.गोवंडी) असे गुन्हा दाखल झालेल्या पतीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भोईवाडा पोलिस ठाणे हद्दीत राहणाऱ्या पीडित ३२ वर्षीय विवाहितेचे फकरुददीन याच्याशी ३ सप्टेंबर २०१८ मध्ये लग्न झाले होते. सुरुवातीचे काही दिवस चांगले गेल्यानंतर कालांतराने त्यांच्यात क्षुल्लक कारणावरून खटके उडत होते. सप्टेंबर २०२५ रोजी पीडितेला मुलगा झाला. पीडिता ७ सप्टेंबर रोजी हॉस्पिटल मधून डिस्चार्ज घेऊन घरी आल्यानंतर फकरुद्दीनने पीडितेला खर्च जास्त झाल्याचे सांगून माहेरहून पैसे घेवून येण्यासाठी तगादा लावून तिला शिवीगाळसह मारहाण करीत १६ ऑक्टोबर रोजी घराबाहेर हाकलून दिले आहे. तसेच पीडितेला व तिच्या मुलाला खर्चासाठी पैसे देणे बंद करून पीडितेने पैश्यांची मागणी केली.

# ठाण्यात सदनिकेचे प्लास्टर पडून एकाचा मृत्यू; दोघे किरकोळ जखमी

**ठाणे :** शनिवारी पहाटे सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास ठाण्यातील लोकमान्यनगर, पाडा क्रमांक २ येथे एका सदनिकेच्या छतावरील प्लास्टरचा काही भाग कोसळून एकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेत एकाच कुटुंबातील तिघांवर प्लास्टर पडले असून, भाडेकरू मनोज मोरे (४५) यांचा मृत्यू झाला आहे. तर त्यांची पत्नी अर्पिता मोरे (४२) आणि मुलगा आरुष मोरे (१६) हे दोघे किरकोळ जखमी झाले आहेत, अशी माहिती ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

लोकमान्यनगर, पाडा क्रमांक २ परिसरात असलेली करुमेदेव सोसायटी ही सात मजली इमारत असून तिचे बांधकाम सुमारे १६ वर्षे जुने आहे. या सोसायटीच्या टेरेसवरील रूम क्रमांक ८०२ मधील हॉलच्या छतावरील प्लास्टरचा काही भाग शनिवारी पहाटे अचानक कोसळला. सदर इमारतीत एकूण ५३ सदनिका असून, त्यापैकी तीन सदनिका टेरेसवर आहेत. त्यातील रूम क्रमांक ८०२ ही सदनिका कलावती वर्मा यांच्या मालकीची आहे. या सदनिकेत मोरे कुटुंब भाड्याने राहत होते. या घटनेप्रकरणी वर्तकनगर पोलीस पुढील तपास आणि कायदेशीर कारवाई करत असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून देण्यात आली आहे.

# प्रलंबित मागण्यांसाठी पालिका मुख्यालयावर काँग्रेसचे आंदोलन

**वसई :** वसई विरार शहरातील विविध नागरी समस्या आश्वासन देऊनही न सोडविल्याने काँग्रेसने महापालिका मुख्यालयावर बुधवारी आंदोलन केले. यावेळी समस्या न सोडविल्याने अधिकाऱ्यांना धारेवर घरले.

वसई – विरार शहरातील नागरिक नादुरुस्त रस्ते, अपुरा पाणीपुरवठा, बंद पथदिवे, अपुऱ्या आरोग्य सुविधा अशा विविध समस्यांमुळे त्रस्त आहेत. तर महापालिका अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रार करूनही समस्या मार्गी लागत नसल्यामुळे नागरिकांची गैरसोय वाढत आहे. याबाबत काँग्रेस शिष्टमंडळानेही पालिका अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या होत्या.

मात्र, त्यानंतरही शहरातील विविध ठिकाणची कामे प्रलंबित असल्यामुळे बुधवारी काँग्रेस पदाधिकारी व ३०० ते ४०० कार्यकर्त्यांनी महापालिकेच्या मुख्यालयात आंदोलन केले.

जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे जनतेचे प्रश्न आणि समस्यांबाबत नऊ प्रभागात आंदोलने केली होती, बैठकाही झाल्या. अधिकाऱ्यांनी आयुक्तांकडून नागरिकांच्या मागण्या मंजूर करून घेऊ, असे आश्वासन दिले. मात्र, वर्षभरात एकही काम झाले नाही. त्यामुळे आयुक्तांकडून लेखी मंजुरी मिळेपर्यंत आंदोलन स्थगित होणार नाही, अशी प्रतिक्रीया जिल्हाध्यक्ष ओनील आल्मेडा यांनी दिली.

# राज ठाकरे यांची ठाणे न्यायालयात हजेरी ?

**ठाणे :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे गुरुवारी ठाणे न्यायालयात हजर राहण्याची शक्यता आहे. ठाण्यातील एका सभेमध्ये राज ठाकरे यांना तलवार देण्यात आली होती. ती तलवार राज ठाकरे यांनी हवेत उंचावली होती. या प्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता. या प्रकरणाची सुनावणी ठाणे न्यायालयात पार पडणार आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मशिदीवरील भोंग्याच्या मुद्द्यावरून तत्कालीन महाविकास आघाडी सरकारला कोंडीत पकडले होते. राज ठाकरे यांनी एप्रिल २०२२ मध्ये ठाण्यात 'उत्तर सभा' घेतली होती. येथील गडकरी रंगायतन चौकात पार पडलेल्या या सभेमध्ये राज ठाकरे यांचे व्यासपीठावर आगमन झाल्यानंतर ठाण्यातील मनसे पदाधिकाऱ्यांनी राज ठाकरे यांना तलवार भेट दिली होती. त्या वेळी राज ठाकरे यांनी व्यासपीठावर तलवार म्यानातून काढून हवेत उंचावली होती. या घटनेनंतर नौपाडाचे तत्त्वकालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय धुमाळ यांच्या तक्रारीनुसार राज ठाकरे, अविनाश जाधव आणि रवींद्र मोरे यांच्यासह इतरांविरोधात गुन्हा दाखल झाला होता.

# वाहतूक पोलिसांची सिग्नलवर जनजागृती

**नवी मुंबई :** कितीही दंडात्मक कारवाई केली तरीही वाहतूक नियमांचे उल्लंघन कमीअधिक प्रमाणात होतच असते. त्यासाठी वाहतूक विभाग जनजागृतीचे कार्यक्रमही आयोजित करतो. मात्र कार्यक्रम संपला की काही वेळात विषय संपतो अशी अवस्था असल्याने आता तर थेट वाहतूक पोलिसांनी सिग्नलवर हातात फलक घेत जनजागृत्ती केली. या फलकांवर वाहतूक नियम पाळण्याविषयी आवाहन करण्यात आले. कृषी उत्पन्न बाजार समिती आवारात रिक्षा आणि दुचाकी वाहने सिग्नल तोडणे, बेशिस्त पार्किंग, अचानक ब्रेक मारून गाडी थांबवणे असे प्रकार होत असल्याने छोटे मोठे अपघात होतात. त्यांना वाहतूक पोलीस वेळोवेळी कारवाई करत असतात. मात्र आता वाहतूक पोलिस गांधीगिरी करीत सिग्नलचा लाल दिवा लागला की थांबलेल्या वाहनचालकांना वाहतूक नियमांचे महत्त्व पटवून देत आहेत. विशेष म्हणजे रस्त्यावर एका रांगेत आणि हातात फलक धरून उभे राहत आहेत. या फलकांवर वाहतुकीचे नियम आणि त्यांचे महत्त्व असणारी वाक्ये ठळक अक्षरात लिहिलेली आहेत.

# चोरलेले मोबाइल नागरिकांना परत

**डोंबिवली :** डोंबिवली पश्चिमेतील विष्णुनगर पोलीस ठाण्यात अनेक नागरिकांनी मोबाइल चोरीला, गहाळ झाल्याच्या तक्रारी गेल्या काही महिन्यांच्या कालावधीत केल्या होत्या. विष्णुनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रामचंद्र चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या तपास पथकांनी विविध भागांत जाऊन हे गहाळ, चोरी झालेले मोबाइल शोधून मंगळवारी विष्णुनगर पोलीस ठाण्यातील एका विशेष कार्यक्रमात मोबाइलधारक रहिवाशांना त्यांचे मोबाइल साहाय्यक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे यांच्या हस्ते परत करण्यात आले.

मागील काही महिन्यांच्या काळात विष्णुनगर पोलीस ठाण्यात मोबाइल गहाळ झाल्याच्या, चोरीला गेल्याच्या तक्रारी दाखल झाल्या होत्या. या वाढत्या तक्रारींची दखल घेत पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, साहाय्यक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे यांच्या आदेशावरून विशेष पोलीस पथक तयार करून या प्रकरणांचा तपास सुरू केला होता. पोलीस पथकाने गहाळ झालेल्या या मोबाइलमधील तांत्रिक माहितीच्या आधारे विविध भागांतून, काही परराज्यांतून २६ मोबाइल हस्तगत केले. या सर्व मोबाइलची सत्यता पडताळून ते नागरिकांना परत केले.

# तळोजात विवाहितेवर शेजाऱ्याने दोन वेळा जबरदस्तीने लैंगिक अत्याचार; आरोपी अटकेत

**प्रतिनिधी जनतेचा सावधान महाराष्ट्र : तळोजा, नवी मुंबई : तळोजा परिसरात एका धक्कादायक घटनेचा उलगडा झाला असून एकाच इमारतीत राहणाऱ्या ३० वर्षीय विवाहितेच्या घरात घुसून आरोपीने दोन वेळा जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. संदीप (वय ३२) असे आरोपीचे नाव असून तळोजा पोलिसांनी त्याच्यावर बलात्कार व धमकावल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून अटक केली आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार विवाहिता व आरोपी हे दोघेही तळोजा येथील एकाच इमारतीत वास्तव्यास आहेत. मे २०२५ च्या सुरुवातीला आरोपी संदीप याने पीडित महिलेला प्रपोज केले होते. मात्र महिलेने स्पष्ट नकार दिल्यानंतरही आरोपीने तिचा पाठलाग सुरूच ठेवला. जून २०२५ च्या सुरुवातीला, पीडित महिला घरी एकटी असताना व तिचा लहान मुलगा बाहेर खेळत असताना दुपारी सुमारे २ वाजता आरोपीने तिच्या घरात जबरदस्तीने प्रवेश केला. यावेळी आरोपीने महिलेला व तिच्या मुलाला जीवे मारण्याची धमकी देत तिच्यावर जबरदस्तीने शारिरीक अत्याचार केला.

या घटनेनंतर पीडित महिला मानसिक धक्क्यात होती. बदनामीच्या भीतीने तिने हा प्रकार कोणालाही सांगितला नाही. मात्र तिच्या शांततेचा गैरफायदा घेत आरोपीने जुलै २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात पुन्हा एकदा दिवसा तिच्या घरात घुसून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. यानंतरही आरोपी थांबला नाही. रस्त्यात तसेच इमारतीत ये - जा करताना तो पीडित महिलेला अडवून धमकावत होता व हा प्रकार कुणाला सांगितल्यास संपूर्ण कुटुंब संपवण्याची धमकी देत होता.

सततच्या धमक्या व अत्याचारांमुळे त्रस्त झालेल्या पीडित महिलेने अखेर आपल्या पतीला सर्व प्रकार सांगितला. पतीच्या पाठिंब्याने तिने तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनंतर तळोजा पोलिसांनी आरोपीविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ६४ (२) (म) व ३५१ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने कारवाई करत १३ डिसेंबर रोजी आरोपी संदीप याला अटक केली आहे.

या गंभीर घटनेमुळे तळोजा परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# ऐरोलीत सिडकोची धडक कारवाई; अनधिकृत आरसीसी बांधकाम जमीनदोस्त

**प्रतिनिधी जनतेचा सावधान महाराष्ट्र: ऐरोली, नवी मुंबई :** सिडकोच्या अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) विभागामार्फत दिनांक १५/१२/२०२५ सोमवार रोजी ऐरोली नोड येथे मोठ्या प्रमाणावर निष्कासन मोहीम राबविण्यात आली. सिडको अधिसूचित जागेवरील सेक्टर ०१, मौजे ऐरोली, सर्व्हे नंबर २११ येथील अंदाजे २२० चौ. मी. क्षेत्रफळाचे आरसीसी स्वरूपातील अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले.



या कारवाईत एकूण २० स्लॅब व १० किचन ओटे ब्रेकरच्या सहाय्याने तोडण्यात आले. सदर अतिक्रमण सिडकोच्या प्रचलित नियमावली व धोरणांचा भंग करून तसेच सिडको महामंडळाची कोणतीही अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

ही मोहीम मा. मुख्य दक्षता अधिकारी श्री. सुरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार व मा. मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सिडको ऐरोली अतिक्रमण विभागाचे अधिकारी, स्थानिक पोलीस अधिकारी व सिडको पोलीस पथक, महावितरण विभागाचे अधिकारी, सिडको सुरक्षा रक्षक तसेच महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे सुरक्षा रक्षक यांच्या संयुक्त सहभागाने ही कारवाई यशस्वीपणे राबविण्यात आली.

कारवाईदरम्यान ०८ ब्रेकर, १२ कामगार, २ जीप, १ टेम्पो ट्रॅव्हलर व १ रुग्णवाहिका तैनात ठेवण्यात आली होती. सिडकोच्या अधिसूचित जागांवरील अतिक्रमणांविरोधात भविष्यातही अशीच कठोर व सातत्यपूर्ण कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

# एमआयडीसी क्षेत्रातही रस्ते व दुभाजक येथे सखोल स्वच्छता मोहीम व धूळ नियंत्रणात्मक उपाययोजना

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात नियमीत स्वच्छतेसोबतच वायू प्रदूषण प्रतिबंधात्मक मोहीमा प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत मुख्य रस्त्यांप्रमाणे एमआयडीसी क्षेत्रातील रस्त्यांचीही सखोल स्वच्छता केली जात आहे. यामध्ये रस्त्यांवरील माती ब्रशने तसेच फ्लपर मशिनने काढून ती वाहून नेण्यात येत आहे व रस्ते प्रक्रीयाकृत पाण्याने धुवून घेण्यात येत आहेत.

या अनुषंगाने आज घणसोली विभागात रबाळे एमआयडीसी भागामध्ये आज महानगर टेलिफोन निगम लिमिटेड समोरील मुख्य रस्त्यावर वृषाली हॉटेल ते कल्पना हॉटेल पर्यंतच्या रस्त्यावर सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये ३० स्वच्छताकर्मींचा समुह कार्यरत होता. त्यासोबतच याभागात एनकॅप वाहनाव्दारे हवेमध्ये कारंजासारखे पाण्याचे फवारे मारुन हवेतील धूळ कमी करण्यासाठी कार्यवाही करण्यात आली.

अशाच प्रकारची सखोल स्वच्छता मोहीम रबाळे येथे सिध्दार्थनगर ते फायबर कंपनी दरम्यानच्या रस्त्यावर राबविण्यात आली. या मोहीमांमध्ये रस्त्यांची स्वच्छता करुन माती संकलित करण्याप्रमाणेच रस्त्याच्या कडेला पडलेला बांधकामाचा व पाडकामाचा राडारोडा उचलून नेण्यात आला.



महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी २५ नोव्हेंबर रोजीच्या आढावा बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली, विभाग स्तरावर रस्ते स्वच्छता व धूळ नियंत्रण उपाययोजना करण्यासाठी पथके तयार करण्यात आली असून विभाग अधिकारी तथा सहा. आयुक्त यांच्या माध्यमातून संबंधित विभाग कार्यालय क्षेत्रात दैनंदिन नियमीत करण्यात येणाऱ्या साफसफाई कामाच्या जोडीला हवेतील वायू प्रदूषण कमी करण्यासाठी सखोल स्वच्छता मोहीमा राबविण्यात येत आहेत.

जनतेचा सावधान महाराष्ट्र
निर्भीड आणि निष्पक्ष

# संदीप नाईक प्रतिष्ठानचा शैक्षणिक उपक्रम; एस. एस. सी सराव परीक्षा प्रश्नपत्रिका संचांचे भव्य वितरण



**प्रतिनिधी जनतेचा सावधान महाराष्ट्र: नेरुळ, नवी मुंबई :** संदीप नाईक प्रतिष्ठान आयोजित संदीप नाईक एस. एस. सी सराव परीक्षा २०२५ - २०२६ या उपक्रमांतर्गत प्रश्नपत्रिका संच वितरण सोहळ्याचे आयोजन नेरुळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात करण्यात आले. विशेष बाब म्हणजे या सराव परीक्षेचे हे २७ वे यशस्वी वर्ष असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी हा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे.

यावर्षी या सराव परीक्षेत एकूण ५२ केंद्रांमधून सुमारे ९ हजार विद्यार्थी सहभागी होणार आहेत. मात्र यंदा परीक्षेच्या स्वरूपात महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला असून परीक्षा केंद्रावर प्रत्यक्ष परीक्षा न घेता विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका संच वितरित करण्यात आले आहेत. हे प्रश्नपत्रिका संच मराठी, सेमी इंग्रजी, इंग्रजी आणि हिंदी या भाषांमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

या उपक्रमाच्या माध्यमातून दहावीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयाचे तीन प्रश्नपत्रिका संच सोडविण्याची संधी मिळणार असून त्यामुळे सराव वाढण्यास मोठी मदत होणार आहे. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढावा, अधिकाधिक प्रॅक्टिस व्हावी, स्वत:तील उणिवा ओळखून सुधारणा करता यावी आणि बोर्ड परीक्षेला सक्षमपणे सामोरे जाता यावे, या उद्देशाने हा अभिनव प्रयोग राबविण्यात आला आहे.

या प्रश्नपत्रिका संचांच्या मागील बाजूस देण्यात आलेल्या क्यूआर कोडद्वारे विद्यार्थी स्वत:ची उत्तरे तपासू शकणार असून हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. संदीप नाईक प्रतिष्ठानच्या या शैक्षणिक उपक्रमामुळे दहावीच्या विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेपूर्वी योग्य मार्गदर्शन व सरावाची संधी मिळणार असल्याने पालक व शिक्षक वर्गातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# सानपाडा – पामबीच सोनखार भुयारी मार्गाचे भूमीपुजन: दशरथ भगत यांच्या कार्याची सागर नाईक यांच्याकडून प्रशंसा



**प्रतिनिधी जनतेचा सावधान महाराष्ट्र : सानपाडा, नवी मुंबई :** निवडणुकीपुरते जाहीरनामे देऊन विसर पडणारे अनेक उदाहरणे असताना दशरथ भगत व भगत कुटुंबियांनी दिलेली वचने प्रत्यक्ष कामातून पूर्ण करून मतदारांचा विश्वास अधिक दृढ केला आहे, असे गौरवोद्‌गार माजी महापौर सागर नाईक यांनी सानपाडा - पामबीच येथील केसर सॉलिटेअर जवळील सोनखार भुयारी मार्गाच्या भूमीपुजन कार्यक्रमात काढले.

२०१५ साली मोराज सर्कल मार्गे पामबीच वसाहतीत येणाऱ्या मार्गावरील वाहतूक कोंडी कमी व्हावी यासाठी तत्कालीन नगरसेवक दशरथ भगत यांनी स्वखर्चाने पर्यायी भुयारी मार्गाचा आराखडा तयार करून तो महापालिकेकडे मंजुरीसाठी सादर केला होता. या आराखड्यासाठी माजी नगरसेविका फशीबाई भगत, रुपाली भगत व वैजयंती भगत यांनी दशरथ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने पाठपुरावा केला. आराखड्याला मंजुरी मिळूनही कांदळवन व पर्यावरणास हानी होईल या कारणास्तव प्रस्ताव अडकून पडला होता. त्यानंतर ना. गणेश नाईक मंत्री झाल्यानंतर हा अडथळा दूर झाला आणि सानपाडा - पामबीच विभागातील हजारो नागरिकांचे स्वप्न साकार झाले, असे सागर नाईक यांनी नमूद केले.

दशरथ भगत यांनी वाशी गाव तसेच सोनखार परिसरातील मतदारांना दिलेली वचने पूर्णत्वास नेल्याचे सांगत वाशी गावात राष्ट्रीय महामार्गाखाली तीन भुयारी मार्ग, सानपाडा सोनखार येथे सुरू होणारा हा भुयारी मार्ग आणि संकल्पनेतील अन्य दोन भुयारी मार्ग यामुळे दशरथ भगत यांचा उल्लेख भुयारी मार्ग स्पेशालिस्ट असा केला जात असल्याचे सागर नाईक यांनी यावेळी सांगितले.

सानपाडा - पामबीच येथील केसर सॉलिटेअर जवळील भुयारी मार्गामुळे पामबीचवरून अंतर्गत भागात येताना मोराज सर्कल येथे दररोज होणारी वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होणार असून अपघातांचे प्रमाण व प्रदूषणातही घट होणार आहे.

दशरथ भगत यांचे प्रभागातील प्रत्येक असुविधेवर बारकाईने लक्ष असल्याचे सांगत, या भुयारी मार्गामुळे वाहतूक कोंडी सुटण्यासोबतच परिसरातील मालमत्तांच्या किमतीतही वाढ होणार असल्याचे सागर नाईक यांनी स्पष्ट केले. ना. गणेश नाईक यांची दूरदृष्टी, माजी खासदार संजीव नाईक व माजी महापौर सागर नाईक यांचे मार्गदर्शन तसेच सोनखार परिसरातील नागरिकांचा विश्वास व पाठिंबा यामुळे हे शक्य झाल्याबद्दल दशरथ भगत व निशांत भगत यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

महापालिकेच्या वर्कऑर्डरनुसार सदर भुयारी मार्गाचे काम येत्या १८ महिन्यांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून या कार्यक्रमास सानपाडा - पामबीच विभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रबाळे मधील १९ वंचित बालकांना बुध्दिबळ मध्ये ‘फिडे’ मानांकन मा महापौर सुधाकर सोनवणे यांचा तर्फे सन्मान



**जनतेचा सावधान महाराष्ट्र : नवी मुंबई :** अशक्यप्राय वाढणाऱ्या स्वप्नांना सत्यात उतरवणाऱ्या एका चमत्कारी कथेने नवी मुंबई शहराला मोठा मान मिळवून दिला आहे. आर्थिक दुर्बल घटकांतून आलेल्या १९ तरुण बुध्दिबळपटूंनी केवळ जिद्द आणि समर्पणाच्या बळावर जागतिक स्तरावरील फिडे मानांकन प्राप्त करण्याची ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

गेल्या तीन वर्षांत ‘चिल्ड्रन ऑफ द वर्ल्ड ट्रस्ट (इंडिया)’च्या विश्वबालक केंद्रातील १९ विद्यार्थ्यांनी ‘फिडे’ मानांकन कमावण्याचे यश संपादन केले असून, या वर्षी एकट्या १२ खेळाडूंनी ‘फिड’ मानांकन मिळवत त्यांच्या भविष्यासाठी क्वी ‘चाल’ दिली आहे. या खेळाडूंचा ‘नजी मुंबई’चे माजी महापौर सुधाकर सोनवणे यांच्या तर्फे सन्मान करण्यात आला. याप्रसंगी माजी नगरसेविका डॉ. गौतमी सोनवणे, बुध्दिबळ प्रशिक्षक नंदकुमार सर, वर्षो काळे, सुझन जंकर, महेश सर, शशिकांत वाघमारे, स्नेहल विशे, अमोल खरसंबळे, जितेंद्र सोनी, सिनी नंदघ्कुमार, मिनी वर्गीस, शशिकांत प्रसाद, हर्ष, रिचा राजपूत यांच्यासह खेळाडू, पालक मोठवा संख्येने उपस्थित होते.

विश्वबालक केंद्रातील सर्व १९ ‘फिडे’ गानांकन प्राप्त खेळाडू रबाळे येथील झोपडपट्टी भागात राहणारे आहेत. या भागात, व्यावसायिक प्रशिक्षण, साहित्य सर्धा शुल्क किंवा प्रवासाचा खर्च यांसारख्या गोष्टींची कमतरता असते. मात्र, त्यांच्यातील सुप्त मतिभेला योग्य संधी मिळाली, प्रशिक्षक नंदकुमार यांच्या ‘एका वेळी एक बाल’ या मार्गदर्शनाखाली, मुलांना केवळ तांत्रिक कौशल्येच नव्हे, तर धोरणात्मक विचार आणि मानसिक बळही शप्त झाले.

शफिडेश मानांकन प्राप्त खेळाडूंमध्ये अंश ओमप्रकाश यादव (१६३७), अंजू रतन बोगती (१६०९), अखिलेशकुमार रामतिरथ यादव (१५९५), मंजू रतन बोगती (१५१३), नंदिनीकुमारी गणेशचंद्र झा (१५०८), मनोज रतन सिंग (१४९८), आयेशा खातून अल्फिद खान (१४८५), रजनीश संजय राम (१४७०), पिती गुड्डू गौड (१४६७), महक जवाहरलाल प्रजायली (१४६२), निरज रतन सिंग (१४५८), रुबी प्रमोद शैलेंद्र सिंग (१४४९), सत्यमकुमार संतोष सिंग (१४४७), लल्लुन मोहन साहू (१४३९), कुमार बुधिरम जयस्वाल (१४२८), वंश दिनकर उपाध्याय (१४२४), अमित राजू चौहान (१४१८), लब मनोजकुमार योगी (१४१०, आणि विवेक विमल बनिया (१४०३) यांचा समावेश आहे. माजी महापौर सुधाकर सोनवणे या बुध्दिबळ क्रांतीचे मूळ आधारस्तंभ आहेत. त्यांनी ‘चिल्ड्रन ऑफ द वर्ल्ड इंडिया ट्रस्ट’ आणि ‘अंजनीबाई देशभ्रतार बुद्धिबळ अकादमी’ या संस्थाया पाठीशी खंबीरपणे उभे राहून बुध्दिबळपटूंना मुलांना आवश्यक संसाधने आणि नैतिक पाठिंबा पुरवला. त्यांच्या पाठिंब्यामुळेच वंचित मुलांना जागतिक दर्जाच्या क्रीडा प्रवासाची संधी मिळाली आहे. कठोर परिश्रम आणि योग्य मार्गदर्शन यांमुळे कोणतेही ध्येय आवाक्याबाहेरचे नसते, हेब या सर्व खेळाडूंनी सिध्द केले आहे, असे प्रशिक्षक नंदकुमार यांनी सांगितले.

कष्टकऱ्यांच्या वस्तीमध्ये राहणारी मुलं जी बुद्धबळासारख्या खेळाचं स्वप्नही बघू शकत नाहीत, त्या खेळामध्ये त्यांना आंतरराष्ट्रीय मानांकन मिळणे छोटी गोष्ट नाही, सरकारी शाळेतील मुलांना ‘फिडे’ मानांकन मिळणे भूषणावह आब आहे. त्याकरिता नवी मुंबई महापालिका आयुक्त, शिक्षणाधिकारी, आणि मुलांना शिकवणारे नंदकुमार सर यांच विशेष कौतुक आहे. ज्यांनी स्वखर्चाने मुलांचा आहार बघितला. समाजाचे देणे ज्याला म्हणतात ते त्यांनी खऱ्या अर्थाने केले आहे, अशी प्रतिक्रिया मुलांनी बुध्दिबळ खोळामध्ये मिळवलेल्या यशाविषयी माजी महापौर सुधाकर सोनवणे यांनी व्यक्त केली.

# वाशी बस स्थानक अखेर प्रवाशांच्या सेवेत; १५ डिसेंबरपासून बस सेवा सुरू



**प्रतिनिधी जनतेचा सावधान महाराष्ट्र : तुर्भे, नवी मुंबई :** बहुप्रतिक्षित वाशी बस स्थानक अखेर १५ डिसेंबरपासून प्रवाशांच्या सेवेत दाखल झाले असून नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या आदेशानुसार येथून बस सेवा कार्यान्वित करण्यात आली आहे. विशेष बाब म्हणजे राज्यातील महापालिका निवडणुकांची आचारसंहिता घोषित होण्याच्या काही तास आधी कोणतेही उद्‌घाटन न करता वाशी बस स्थानक सुरू करण्यात आले आहे.

सध्या केवळ वाशी बस स्थानक कार्यान्वित करण्यात आले असून अन्य कोणत्याही व्यावसायिक किंवा पूरक सेवा अद्याप सुरू करण्यात आलेल्या नाहीत. २०२० साली सुमारे १९० कोटी रुपये खर्चून अत्याधुनिक वाशी बस डेपोचे काम हाती घेण्यात आले होते. या ठिकाणी बस स्थानकासह कार्यालये, पार्किंग, हॉटेल व सभागृह विकसित करण्यात आले असून ही इमारत तब्बल २१ मजली आहे. बांधकाम पूर्ण होऊन एक वर्षाहून अधिक कालावधी लोटला असतानाही बस डेपो प्रवाशांच्या सेवेत नसल्याने नवी मुंबई महापालिका प्रशासनावर सातत्याने टीका होत होती. अखेर काही महिन्यांपूर्वी भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर १५ डिसेंबरपासून वाशी बस स्थानक सुरू करण्यात आले आहे.

वाशी बस स्थानकामधून वाशी रेल्वे स्थानक व तुर्भेकडून कोपरखैरणेकडे जाणाऱ्या सर्व एनएमएमटी बसेस या बस स्थानकातून जाणार आहेत. मात्र कोपरखैरणेकडून वाशी रेल्वे स्थानक तसेच तुर्भे व पनवेलकडे जाणाऱ्या बसेस पूर्वीप्रमाणेच विष्णुदास भावे नाट्यगृहाजवळूनच जाणार आहेत. तसेच कोपरखैरणेकडून वाशी रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या बसेस भावे नाट्यगृह बस थांब्याहून पुढे आपणा बाजारमार्गे वाशी स्टेशनकडे जातील.

सध्या केवळ एनएमएमटी बसेस वाशी बस स्थानकातून धावणार असून बेस्ट प्रशासनालाही बेस्ट बसेस येथे वळविण्याबाबत कळविण्यात आले आहे. मात्र याबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नसल्याने बेस्ट बसेस पूर्वीप्रमाणे विष्णुदास भावे नाट्यगृहासमोरील बस थांब्यावरूनच प्रवास करणार आहेत.

वाशी बस स्थानकाच्या उद्‌घाटनावरून राजकीय श्रेयवाद सुरू असल्याने हा प्रकल्प रखडल्याची चर्चा नवी मुंबईकरांमध्ये होती. त्यामुळे नागरिकांमध्ये महापालिका प्रशासन व स्थानिक राजकीय नेत्यांविषयी नाराजी व्यक्त होत होती. अखेर महापालिका निवडणुकीची आचारसंहिता लागू होताच प्रशासनाने वाशी बस स्थानक सुरू करून नागरिकांच्या संतापाला वाट मोकळी करून दिल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# ३३ लाखांचा जप्त ऐवज मुळ मालकांना परत; नवी मुंबई पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी



**प्रतिनिधी जनतेचा सावधान महाराष्ट्र : नवी मुंबई :** नवी मुंबई पोलिस आयुक्तालय परिमंडळ - २, बेलापूर अंतर्गत सीबीडी व पोर्ट विभागाच्या हद्दीत विविध गुन्ह्यांतून जप्त करण्यात आलेला तब्बल ३३ लाख रुपये किमतीचा ऐवज पोलिसांकडून मुळ मालकांना परत करण्यात आला. एनआरआय सागरी पोलीस ठाणे येथे आयोजित कार्यक्रमात हा ऐवज औपचारिकरित्या सुपूर्द करण्यात आला.

या कार्यक्रमात सीबीडी विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त मयूर भुजबळ तसेच नवी मुंबई पोर्ट विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर गायके यांच्या हस्ते मुळ मालकांना त्यांचा ऐवज परत देण्यात आला. ऐवज हाती मिळताच संबंधित नागरिकांच्या चेहऱ्यांवर समाधान व आनंद स्पष्टपणे दिसून आला.

परत करण्यात आलेल्या ऐवजामध्ये सोने व चांदीचे दागिने, दुचाकी व चारचाकी वाहने, मोबाईल फोन, लॅपटॉप तसेच रोख रकमेचा समावेश आहे. या ऐवजामध्ये कोणाच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावणे, घरफोडी करून सोने व रोकड चोरीस नेणे, घरासमोर उभी असलेली वाहने चोरीस जाणे, वाहनातून लॅपटॉप व मौल्यवान साहित्य चोरीस जाणे, तसेच खिशातून व दुकानातून मोबाईल चोरीस जाणे अशा विविध घटनांचा समावेश होता.

सदर घटनांची नोंद पोलिस दप्तरी झाल्यानंतर नवी मुंबई पोलिसांनी तत्परतेने तपास करून गुन्हे उघडकीस आणले व जप्त केलेला तब्बल ३३ लाखांचा ऐवज मुळ मालकांपर्यंत पोहोचवण्याची प्रभावी कामगिरी बजावली. नागरिकांचा विश्वास दृढ करणाऱ्या या कार्याबद्दल सदरची कामगिरी करणाऱ्या पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## राष्ट्रीय कॉँग्रेस पक्षाने केला बहुजन समाजाचा सन्मान

# पक्षीय एकनिष्ठ प्रदिपकुमार भागूराम सकपाळ यांची जिल्हा कॉँग्रेस उपाध्यक्षपदी वर्णी



**वाशी :** देशात सर्वात जुना व गोरगरिबांचा, निष्ठावंत कार्यकर्त्यांचा तसेच परंपरागत कॉँग्रेस मतदार असलेल्या कॉँग्रेस पक्षाने बहुजन समाजातील बहुआयामी व्यक्तिमत्वचा म्हणजेच प्रदिकुमार भागूराम सकपाळ यांना जिल्हा उपाध्यक्षपद देऊन त्यांच्या समाजसेवेचा गौरव केला आहे.

पक्षाशी एकनिष्ठ असणाऱ्या सकपाळ यांनी याआगोदर कॉँग्रेस जिल्हा कमिटी - सचिव / सरचिटणीस, बेलापूर तालुका - निरीक्षक, बौद्धजन पंचायत समिती, सिवूड्स उपाध्यक्ष, दी म्युनि. को. ऑप. बँक लि. एम्प्लॉईज वेल्फेअर असो. उपाध्यक्ष, कोकण सामाजिक सेवा संस्था - हिशोब तपासनीस, नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्था - सदस्य, ओरियंटल ह्यूमन राईट्स प्रोटेक्शन फोरम, कोकण विभाग - सरचिटणीस, माता वैष्णोदेवी सार्व. मंडळ - खजिनदार, राजे शिवछत्रपती गणेशोत्सव मंडळ, सिवूड्स पश्चिम - हिशोब तपासणीस, सचिव, खजिनदार, रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यातील धारवली बौद्धजन विकास मंडळ, मुंबई - हिशोब तपासनीस अश्या विविध पदांवर कामे केली आहेत व करीत आहेत.

कॉँग्रेसने दिलेला हा सन्मान बहुजन समाजाचा सन्मान असून नवी जबाबदारी स्वीकारून मी अधिक जोमाने, उत्साहाने व एकनिष्ठतेने पक्षाचे काम करणार असल्याची प्रामाणिक ग्वाही प्रदिपकुमार सकपाळ यांनी दिली. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पक्षाची ध्येयधोरणे, सामाजिक अखंडता, न्याय, समता रुजवण्याचा माझा प्रयत्न असेल.

नवी मुंबई जिल्हा कॉँग्रेस कमिटी व सर्व वरिष्ठानी माझ्यावर विश्वास टाकून जी जबाबदारी दिली त्याबद्दल सर्वांचे जाहीर आभारी आहे.

# कोर्टयार्ड बाय मॅरियटमध्ये मालवणी फूड फेस्टिवलला प्रारंभ; खवय्यांसाठी तळ कोकणाच्या चवींचा मेजवानी सोहळा



**प्रतिनिधी जनतेचा सावधान महाराष्ट्र : नेरुळ, नवी मुंबई :** नवी मुंबईतील नेरुळ येथील प्रतिष्ठित कोर्टयार्ड बाय मॅरियट हॉटेलमध्ये मालवणी फूड फेस्टिवलचे भव्य आयोजन करण्यात आले असून या फेस्टिवलला १२ डिसेंबर रोजी प्रारंभ झाला आहे. दीप प्रज्वलनाने या खाद्य महोत्सवाचे उद्‌घाटन करण्यात आले असून हा फेस्टिवल २१ डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे.

या फेस्टिवलच्या माध्यमातून खाद्यप्रेमींना तळ कोकणातील मालवणच्या समृद्ध आणि पारंपरिक खाद्यसंस्कृतीचा अनुभव घेता येणार आहे. मालवणी जेवणाची खास ओळख असलेले ताज्या समुद्री माशांचे पदार्थ, रस्सेदार खेकडा करी, चिकन व मटनचे अस्सल मालवणी पदार्थ, तसेच घावणे, पुरणपोळी, मोदक यांचा खास समावेश करण्यात आला आहे. याशिवाय शाकाहारी खवय्यांसाठीही खास मालवणी शाकाहारी पदार्थ उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मालवणी पाककृतींमध्ये वापरले जाणारे खास मसाले, नारळाचे दूध, सोलकढी आणि ताज्या समुद्री साहित्याच्या संयोजनामुळे मालवणी जेवणाला जागतिक स्तरावर वेगळी ओळख मिळाली आहे. हॉटेलचे एक्झिक्युटिव्ह शेफ अविनाश नलावडे आणि अजय पाध्ये यांनी पारंपरिक पद्धतीने हे पदार्थ तयार केले असून त्यामुळे कोकणाच्या अस्सल चवीचा अनुभव खवय्यांना मिळत आहे.

खाद्यप्रेमींसाठी हा फेस्टिवल एक पर्वणी ठरत असून नेरुळ येथील कोर्टयार्ड बाय मॅरियटमध्ये भेट देऊन मालवणी जेवणाचा आस्वाद घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. २१ डिसेंबरपर्यंत हा फेस्टिवल सुरू राहणार असून वीकेंडला विशेष गर्दी होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# मार्जिनल स्पेसचा वापर करणाऱ्यांवर तसेच अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाईचा धडाका



नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत मार्जिनल स्पेसचा बेकायदेशीर वापर करण्याऱ्यांविरोधात सर्वच विभाग कार्यालय क्षेत्रात धडक मोहीम हाती घेण्यात आली असून बेलापूर विभागाप्रमाणेच आज वाशी विभागामध्ये सेक्टर १७ आणि सेक्टर २ परिसरात मार्जिनल स्पेसचा वापर करणाऱ्या व्यावसायिकांविरोधात धडक मोहीम राबविण्यात आली व त्यांचे साहित्य जप्त करून कोपरखैरणे येथे जमा करण्यात आले. अशाच प्रकारची कारवाई एपीएमसी मार्केट परिसरात सेक्टर १९ येथे करण्यात येऊन त्याठिकाणीही मार्जिनल स्पेसचा वापर करणाऱ्या व्यावसायिकांचे सामान जप्त करण्यात आले. या मोहीमेमध्ये १ लक्ष ५५ हजार दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली. त्यासोबतच वाशी, तुर्भे, कोपरखैरणे, घणसोली विभागातील अनधिकृत फेरीवाल्यांवरही कारवाई करण्यात आली. त्याचप्रमाणे सर्व विभागांमध्ये विनापरवानगी बॅनर्स हटविण्याची मोहीम राबविण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे निर्देशानुसार सर्वच विभाग कार्यालय क्षेत्रांमध्ये अतिरिक्त आयुक्त डॉ राहुल गेठे व अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड यांचे मार्गदर्शनखाली नागरिकांना रस्ते व पदपथ चालण्यासाठी खुले असावेत याकरिता अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे याप्रमाणेच मार्जिनल स्पेसचा वापर करणाऱ्यांविरोधात व अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात धडक कारवाई करण्यात येत आहे.

Printed by AIS Printing Solution Published by RAJENDRA KARBHARI BODAKE on behalf of RAJENDRA KARBHARI BODAKE, printed at Thane and published at NIKITA APT,PLOT NO-7/A,SHOP NO-03, SECTOR-5, KOPAR KHAIRANE, NAVI MUMBAI editor RAJENDRA KARBHARI BODAKE Email : savadhanmaharashtra@gmail.com